# ।। जति को संवाद ।।
# मारवाडी + मराठी
✻

महत्वाची सुचना:–    रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

## ।। अथ जति को संमाद लिखंते ।।

।। साखी ।।

**त्रिगुटी में सुर तीन मिल ।। आगे सुर मिल सात ।।**
**जत्ति बूझ सुखराम के ।। सुणे ब्रम्ह की बात ।।१।।**

त्रिगुटीत तीन सुर मिळतात आणि पुढे सात सुर मिळतात,जत्ती,तू मला विचार,माझ्या पासून सतस्वरुप ब्रम्हची गोष्ट ऐका. ।।१।।

**त्रिगुटी हद में जाणिये ।। माया लग सब जोय ।।**
**जती बूज सुखराम के ।। ब्रम्ह अगम मे होय ।।२।।**

अरे जत्ती,त्रिगुटी हद्दीत आहे आणि जेथपर्यंत माया आहे,तेथपर्यंत सर्व हद्दीतच आहे, जती,तू मला विचार,ब्रम्ह हे तर अगम आहे,बेहद्दच्या परे आहे. ।।२।।

**माया ब्रम्ह की हद हे ।। ज्याहाँ लग हद पिछाण ।।**
**जती बूज सुखराम के ।। ब्रम्ह अगम में जाण ।।३।।**

माया आणि ब्रम्हची हद्द आहे तेथपर्यंत हद्द जाणा त्रिगुटीच्या अलीकडे माया आहे आणि त्रिगुटीच्या पलीकडे ब्रम्ह आहे,या दोघांच्या माया आणि ब्रम्हच्या पलीकडे अगम आहे,जती,तूं मला विचार,मी सांगतो,तो सतस्वरुप ब्रम्ह तर अगम आहे. ।।३।।

**बाजा रेग्या सेर मे ।। हम पूँता अगम अस्तान ।।**
**जती बूज सुखराम के ।। ज्याँ देहे बिन धरणो ध्यान ।।४।।**

आदि सतगुरू सुखरामजी महाराज जत्तीस बोलले की,तूम्ही बाजा म्हणतात,तर तुम्ही इकड्च्याच शहरांत राहून गेले,मी तर अगम स्थानावर पोहोचून गेलो,जाऊन पोहोचलो आहे. जती,तू मला विचार,तेथे देहाशिवाय ध्यान करावे लागते. ।।४।।

**कर माळा नही फेरिये ।। बिन रसणा को जाप ।।**
**जती बूज सुखराम के ।। रंग बिन रंग दिखाय ।।५।।**

तेथे हाताने माळा फेरावी लागत नाही आणि जीभे शिवाय जाप करावा लागतो,जती,तू मला विचार,मी तुला सांगतो,तेथे तर स्वयं(स्वतःच)निरंजन आहे.तो काळाही नाही आणि सफेद(गोरा)ही नाही.तो पाच तत्वातही नाही आहे,जती,तू मला विचार,तेथिल रंगाशिवाय रंग रूपी दिसू दिसतो.।।५।।

**सात धात गुण तीन नहीं ।। प्रगत नहिं पचीस ।।**
**जती बूज सुखराम के ।। ज्याँ मूरत बिस्वाबीस ।।६।।**

तेथे सात धातू आणि तीन गुण(रज,तम व सत)हे तीन गुण त्रिगुणी मायाही नाही आणि पंचवीस प्रकृतीही तेथे नाही,जती,तूं मला विचार,मी तुला सांगतो,तेथे हे वरील नसुन तेथे सतस्वरुप मुर्ती विस विस्वे म्हणजे शंभर टक्के आहे. ।।६।।

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

लखणे मे कुछ आवसी ।। देखण मे कुछ नाय ।।
जती बूज सुखराम के ।। संत बतावे मांय ।।७।।

ती मुर्ती दिसत तर काही नाही,परंतु थोडीसी माहित होते,जती,तू मला विचार,मी तुला सांगतो,सर्व पोहचलेले संत,मुर्तीला आपल्या शरीरातच सांगतात.(दाखवतात)।।७।।

सुध बुध ज्याहाँ पूँचे नही ।। मन पवनाँ नही जाय ।।
जती बूज सुखराम के ।। संत रहया लिव लाय ।।८।।

तेथे साधू म्हणजे समज आणि बुध्दीही पोहचत नाही.तेथे मन आणि श्वासही जाऊ शकत नाही,तेथे संत लीव लावून राहिले आहे,हे मी तुला सांगतो,असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज बोलले. ।।८।।

कवत्त ।।

पिता सीस था बास हमारा ।। संख नाळ होय आया ।।
मात ग्रभ सो लिया बसेरा ।। वामें जीव कहाया ।।९।।

पिच्याच्या मस्तकांत म्हणजे भृगुटीत मी रहात होता,मी भृगुटीतून संखनाळेच्या रस्त्याने येऊन मातेच्या गर्भात बसेरा केला म्हणजे मातेच्या गर्भात आलो,पित्याच्या भृगुटीत होतो तोपर्यंत मी ब्रम्ह होतो पित्याची भृगुटी सोडून मातेच्या गर्भात आल्याने जगात मी जीव म्हणवलो.।।९।।

सुभ सू असुभ ऊँच सूं नीचा ।। मै भुगतु भुगताया ।।
मेरा रिजक हमारे सारे ।। अंछया सूं चल खाया ।।१०।।

मी केलेले शुभ आणि अशुभ,नीच व उच्च कर्म फळ मी भोगत आहे,क्रियेमान कर्म करणे हे माझ्याच स्वाधीन आहे,मी माझ्या इच्छेनेच,क्रियेमान कर्म करतो आणि प्रारब्धच्या रुपाने खातो.।।१०।।

अंतकाळ जो हुँती बासना ।। ज्याहाँ मै बासा पाया ।।
के सुखराम बासना ऊपर ।। कर असवारी आया ।।११।।

अंत समयी(वेळी)माझी जेथे वासना होती,तेथे मला राहण्याचे स्थान मिळाले,आदि सतगुरू सुखरामजी महाराज बोलले की,मी वासनेच्यावर सवारी करून आलो आहे. ।।११।।

ना मै ब्राम्हण ना मै बैरागी ।। ना मै फरक फकिरा ।।
ना मै जंगम ना मै जोगी ।। ना मे सिध न पीरा ।।१२।।

मी ब्राम्हणही नाही आणि वैरागीही नाही,मी फरक फकीर ही नाही,मी जंगमही नाही आणि जोगीही नाही तसेच मी सिध्दही नाही आणि पीरही नाही.।।१२।।

ना मै जती ना मै सॉमी ।। ना मै पाखंड होई ।।

**ना मै भेष अभेष न सुणरे ।। लखसी बिरळा कोई ।।१३।।**

मी जत्तीही नाही आणि संन्यासी ही नाही व मी पाखंडीही नाही व मी वेष घेऊन वेषधारी साधूही झालो नाही आणि अभेष म्हणजे बिना वेषाचा नाही,मला कोणी विरळाच जाणेल. ।।१३।।

**च्यारूं बरण जात नहिं मेरे ।। जती अरथ कर लीजे ।।**
**के सुखराम समझ बिन मिथ्या ।। ना पाछे जाब न दीजे ।।१४।।**

मी चारी वर्णात न राहता,माझी जातच नाही,तर जती,तूं याचा अर्थ करून घे,तूं समजल्याशिवाय विना पलटून(पलटल्याशिवाय)खोटे उत्तर देऊ नकोस,असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज जत्तीस बोलले. ।।१४।। ।। इति जती को संमाद संपूरण ।।